**सर्वासाठी पाणी - टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी सन २०१६-२०१७**
**(प्रशासकीय माण्यता आदेश)**

क्र.जशिअ/उपलेखापाल/प्र.मा/२०१६/९२
दिनांक ३० /४/२०१६

**विषयः - जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत कृषि विभाग चंद्रपूर कार्यालयाकडून सन २०१६-१७ कार्यक्रम राबविण्याकरीता अंदाजपत्रकाची तपासणी करुन जिल्हा अधिक्षक चंद्रपूर यांना प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत.**

संदर्भ :-१) महाराष्ट्र शासन जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जलअ-२०१४/प्र.क्र२०३/जल-७ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ५/१२/२०१४

२) मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र क्र/कलि/रोहयो/कावि/७८/२०१६/दिनांक २१/४/२०१६

३) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे पत्र क्रमांक /२१३२/दिनांक २०/४/२०१६ अन्वये

४) जिल्हा स्तरीय मान्यता दिनांक

उपरोक्त शासन निर्णय क्रमांक १ अन्वये सर्वासाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवांर अभियान राबविण्याकरीता मंजुर निधीतील कामांना प्रशासकीय माण्यता देण्याचे व निधी वितरणाचे अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय समन्वयकं समिती यांना प्रदान केलेले आहे. सदर कामांना उपविभागीय अधिकारी कृषि यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे.

सन २०१६-२०१७ साठी जलयुक्त शिवार या उपशिर्षाअंतर्गत रुपये ४१ कोटि विशेष निधी अनुदानातुन अर्थसंकल्पित झालेले आहे. असे गृहित धरुन संदर्भ क्रमांक २ अन्वये सदर कामांना प्रशासकीय माण्यता देण्यात यावी असे मा.विभागीय आयुक्त यांनी कळविले आहे.

शासन निर्णय क्रमांक १ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समन्वय समिती या आदेशान्वये खालील अटि व शर्तीच्या अधीन राहून कृषि विभाग या यंत्रणेसाठी विवरण पत्रातं नमूद रुपये लक्षास प्रशासकीय माण्यता प्रदान करीत आहे.
संबधित यंत्रणा - कृषि विभाग

| अ.क्र | तालुक्याचे नांव | गावाचे नांव | कामाचा प्रकार | गट क्रमांक | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | राजूरा | कुंभेझरी | नाला खोलीकरण | १/७ | २६११४३ |
| २ | | | | १/१ | २४४५०१ |
| ३ | | | | १/२ | १४२९७० |
| ४ | | | | १/३ | २९८४८८ |
| ५ | | | | १/४ | २७९०७९ |
| ६ | | | | १/५ | २०४२७७ |
| ७ | | | | १/८ | ४६८०६० |
| ८ | | | | १/९ | ३७१५०२ |
| | एकुण | | | | २२७८०२० |

**( एकुण रुपये बाविस लक्ष अठयांत्तर हजार विस फक्त )**

**अटि व शर्ती**

१) सन २०१६-२०१७ या चालू आर्थिक वर्षात निधी उपलब्ध होणार आहे हि बाब लक्षात घेवून कामांना प्रशासकीय माण्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) योजनेबाबत शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शन सुचना, निकष तपासणी सूची, अटि व शर्तीनुसार योजनांवर / कामांवर खर्च करणे बंधनकारक राहिल.

३) जिल्हा योजनेकरीता वितरीत केलेले अनुदान या योजनेकरीता / प्रयोजनाकरीता मंजुर करण्यात आले आहे. त्याच योजनेवर / कामांसाठी / प्रयोजनासाठी खर्च करणे बंधनकारक राहिल.

४) कामांचे वेगवेगळया पातळीचे छायाचित्र Simnic प्रणालीत अपलोड करणे बंधनकारक आहे.

५) सदर योजनेत समाविष्ट असलेले काम अन्य कोणत्याही योजनेतून (निधी शिर्षातून) घेण्यात आलेले नाही. याबाबतची खात्री करावी. कामाची द्विरुक्ती होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबधित यंत्रणेची राहिल.

६) सदर योजनेकरीता आपल्या प्रशासकीय विभागाने दिलेल्या सुचनानुसार / लेखा पध्दतीप्रमाणे या कार्यक्रमाचा हिशोब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.

७) तांत्रिक मंजुरी सक्षम अधिकारी यांनी दिलेली आहे. या अटिवरच प्रशासकीय माण्यता प्रदान करण्यात येत आहे.

८) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत योजनेतील योजनाची उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचे ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची जबाबदारी संबधित यंत्रणेची राहिल.

९) योजनेतील कामे पूर्ण झाल्यावर अशा कामांना पून्हा तरतूद वितरीत केली जाणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी. तसेच योजना राबविण्याची संनियत्रण व देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबधित कार्यान्वित यंत्रणेची राहिल.

१०) जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधी मंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबधित कार्यान्वित यंत्रणा व त्याचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहिल.

११) योजने संबधी विधीमंडळास माहिती सादर करणे तसेच विधीमंडळाच्या मार्गदर्शन सुचनाचे पालन करणे, अर्थसंकल्पीत नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबधी कार्यवाही करण्याची जबाबदारी संबधित प्रशासकीय विभागाची राहिल.

१२) योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामाची नोंद मालमत्ता नोंदवहीत करुन त्या कामाचे परीक्षण करण्याची खबरदारी संबधित कार्यान्वित यंत्रणेनी घ्यावी.

१३) कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या आठवडी प्रगती अहवाल दर गुरुवारी सादर करणे आवश्यक राहिल.

१४) कामांच्या गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वित यंत्रणेची राहिल. या योजनावर होणारा खर्च रोख प्रवाहानुसार करण्यात यावा.

१५) सदर कामासाठी लागणारा निधी हा विशेष निधी असल्यामुळे सदर काम कोणत्याही माहे मार्च २०१६ अखेर पूर्ण करणे बंधनकारक आहे.